# आणखी एक जन्म

चंद्रकुमार नलगे

रिया पब्लिकेशन्स्

**आणखी एक जन्म : चंद्रकुमार नलगे**

© **चंद्रकुमार नलगे**
चंद्रबन, साहित्य निवास कॉलनी,
उजाळाईवाडी, कोल्हापूर-४
फोन नं. (०२३१) २६७७०३४

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ५००/-

माझ्या पहिल्याच
'रातवा'
या जबरदस्त आत्मकथनावर
ज्यांनी काळीजमाया केली
त्या समस्त
मराठी वाचकांच्या
चरणी
'आणखी एक जन्म'

किती खेळलो गा इथे
किती मांडियले डाव
उधळले पट सारे
खुंटे काळाचीही धाव.

किती गोंदल्या आभाळी
नक्षत्रांच्या आणाभाका
स्मरता गा आता साऱ्या
चुके काळजाचा ठेका !

‘शिक्षणासाठी आपण लहानपणापासून जे अग्निदिव्य केले त्याची कहाणी ‘रातवा’ वाचताना माझे मन भरून आले. आत्मकथेचा उत्तरार्थ वाचण्यास उत्सुक आहे.’

**ग. प्र. प्रधान**

'रातवा' फार मोठा आवाका असलेलं आत्मकथन.

कोल्हापूरचे श्री. चंद्रकुमार नलगे यांच्या 'रातवा' या प्रदीर्घ आत्मचरित्राची गौरवाने व अग्रक्रमाने नोंद घेतली पाहिजे. हा या आत्मचरित्राचा पहिला भाग आहे. अर्धशतकापूर्वी एका खेडेगावात शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मुलाने शिक्षण घेण्यासाठी जी पायपीट केली आणि अविरत झगडा देऊन आपले शिक्षण पूर्ण केले त्याची ही हृदयाला पीळ पाडणारी कथा आहे. शिक्षण घेत असतानाच त्याला प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करावे लागले त्याची हकीकत त्या काळाच्या बिकट परिस्थितीवर विदारक प्रकाश टाकते. आयुष्याच्या या खडतर प्रवासात आपली काव्यवृत्ती त्याने जोपासली ही गोष्ट तर अविस्मरणीय वाटते. स्वातंत्र्याची ग्रामीण मुलांना मिळालेली ही मोठी देन आहे. या आत्मवृत्ताचा दुसरा भाग पूर्ण झाल्यावर मराठीतले हे एक श्रेष्ठ आत्मचरित्र ठरेल.'

(८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातील उतारा.)

**म. द. हातकणंगलेकर**

# थोडं मनातलं आणि जनातलं

माझा 'रातवा' हा आत्मकथनाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला आणि वाचकांना एकदम पसंत पडला. वाचकांनी झपाटून जाऊन वाचला. मराठीतील एक जबरदस्त आत्मकथन असं त्याचं स्वागत झालं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून उत्फुर्स्तपणे पत्रं यायला लागली. आठवड्यातून दोन तीन तरी पत्रं पोचत. फोन तर सतत येऊ लागले. सर्व स्तरातील वाचकांची प्रतिक्रिया एकच, ''रातवा'च्या सरसतेला तोड नाही. मराठीतील अप्रतिम आत्मकथन. त्याला उपमा नाही. थरारून टाकणारी संघर्ष यात्रा. आयुष्यभर काळजाशी जपून ठेवावं असं अनमोल पुस्तक.'

हा पहिला भाग इतका लोकप्रिय झाला की बघता बघता चार महिन्यात पहिली आवृत्ती संपली. दुसरी काढावी लागली. तीही संपण्याच्या मार्गावर आहे.

या 'रातवा' संबंधी अनेक मान्यवरांनी आपलं भावलेपण कळवले. प्रख्यात समीक्षक डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, 'या आत्मचरित्राची मांडणी खूपच वाचनीय, नेमकी, चित्रदर्शी आहे. वाचकाला खिळवून ठेवते.'

प्रसिद्ध लेखक आनंद यादवांनी, 'रातवाच्या यशाला तोड नाही. त्याचं वाङ्मयीन व ऐतिहासिक कार्य लाख मोलाचे आहे.' अशी प्रशंसा केली आहे.

८१ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष समीक्षक म. द. हातकणंगलेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात, ''रातवा' हे फार मोठा आवाका असलेलं आत्मकथन आहे. याचा दुसरा भाग प्रसिद्ध झाला की मराठीतील श्रेष्ठ दर्जाचे आत्मचरित्र ठरेल.' अशी नोंद केली आहे.

कवी फ. मुं. शिंदे यांनी, ''रातवा' म्हणजे तिमिरातून तीर्थाकडं घेऊन जाणारी जणू कठोर तपश्चर्याच !' असे उद्गार काढले आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी, 'अवघ्या महाराष्ट्राचीच सामाजिक वेदना मांडणारा 'रातवा' हा एक दस्तऐवज आहे.' असा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

शं. ना. नवरे यांनी, 'माझ्या जीवनातील आनंद द्विगुणीत करणारे 'रातवा' हे अत्यंत सरस पुस्तक आहे.' असे म्हटले आहे. तर कवी अशोक नायगावकर यांनी ''रातवा' वाचताना थरारून गेलो. अनेक वर्षांनंतर इतकं सर्व दृष्टींनी उदसून टाकणारं समर्थ आत्मकथन वाचायला मिळालं.' अशी आपली भावना व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रातील विचारवंत, लेखक ग. प्र. प्रधान यांनी 'शिक्षणासाठी लहानपणापासून जे अग्निदिव्य केले त्याची कहाणी वाचताना माझे मन भरून आले. आत्मकथेचा दुसरा भाग वाचण्यास उत्सुक आहे.'

मित्रवर्य प्रा. वि. शं. चौघुले यांनी 'वाङ्मयीन गुणवत्ता सिद्ध करणारे वेगळ्या वाटेने जाणारे हे लेखन.' असे कौतुक केले आहे. जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष, कवी रामदास फुटाणे यांनी तर 'अभिजात वाङ्मयीन गुणवत्ता लाभलेले सर्वांगसुंदर पुस्तक.' अशी शाबासकी दिली आहे.

श्रेष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी 'रातवाचे रंगरूप छानच आहे.' असा निर्वाळा दिला आहे. प्रा. रा. रं. बोराडे यांनी 'आयुष्यभर काळजाशी जपून ठेवावे असे हे पुस्तक आहे.' असे आपले विचार प्रकट केले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक के. ज. पुरोहित ऊर्फ शांताराम यांनी 'दु:ख लेखकाचे असो की लोकांचे, ती दोन्ही दु:खे लेखकाची समर्थ लेखणी भोगते.' असे आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

ब्याऐंशी वर्षांचे सुजाण, मार्मिक दृष्टीचे प्रा. मनोहर किसन कोपर्डे म्हणतात, 'मी आतापर्यंत हजारो पुस्तके वाचली; पण असे जबरदस्त आणि काळजाला जाऊन भिडणारे 'रातवा' हे सर्व श्रेष्ठ पुस्तक आहे.'

मराठीतील श्रेष्ठ लेखक गंगाधर गाडगीळ यांनी, 'जीवनाचे अत्यंत प्रत्ययकारी चित्र रेखाटणारे चंद्रकुमार नलगे यांचे पुढचे पुस्तकही याहीपेक्षा वेधक आणि सरस होईल यात शंकाच नाही.' अशी टिप्पणी केली आहे. गिरीजा कीर तर म्हणतात, 'अप्रतिम शब्दकळा, अप्रतिम लेखन.'

प्रख्यात कवी मंगेश पाडगावकर आपल्या पत्रात म्हणतात, ''रातवा'तील भाषाशैली मनाची पकड घेणारी आहे. ग्रामीण शब्दवैभवाचे मराठीपण अप्रतिम आहे. जीवंत, सुंदर आत्मकथन.' डॉ. अनंत देशमुख 'ललित'च्या लेखात म्हणतात, 'विशिष्ट कालातील सामाजिक, सांस्कृतिक दस्तऐवज म्हणजे 'रातवा'. अत्यंत पारदर्शी चित्र म्हणजे 'रातवा'.'

ज्यांच्या कवितेनं वेगळे परिमाण मराठी साहित्याला दिले आहे ते इंद्रजित भालेराव म्हणतात, 'संपूर्ण लेखनाचा आवाका फार मोठा आहे. 'रातवा'त आपण गुंतून जातो.' समीक्षक प्रा. म. सु. पाटील म्हणतात, 'तीनच दिवसात पुस्तक वाचून काढले. पुस्तक हातून सुटत नाही. अनुभवविश्व भारल्यासारखे आहे.'

या सर्वांच्याप्रमाणेच प्रा. सदानंद देशमुख, विठ्ठल वाघ, यशवंत मनोहर, कुलगुरू माणिकराव साळुंखे, रवींद्र शोभणे, वामन होवाळ, प्रा. कौतिकराव ठाले–पाटील, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील, अरुणा ढेरे, अनंत भावे, द. ता. भोसले, मेजर विजयसिंह देसाई, अनुराधा गुरव, भास्कर चंदनशिव, प्रा. सुरेश सावंत, विद्वांस, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मीनारायण बोल्ली, बाबा भांड, रजनी हिरळीकर, श्याम कुरळे, प्रा. रमेश ओहळ, पंढरीनाथ सावंत, शांताराम चव्हाण, जगन्नाथ कुलकर्णी, रामचंद्र नलावडे, सांगलीचे सुभाष पाटील, एम. जी. शेलार, बाळासाहेब गवाणी, शांतिकुमार वठारे, शाहीर कुंतीनाथ करके, जिंतुरचे बाळासाहेब जाधव, दत्ता हलसगीकर, चंद्रकांत महामिने, पुरुषोत्तम रोहणकार, चंद्रपूरचे नरेंद्र मेश्राम, ठाण्याचे माधव फडके, जगसिंगराव हवालदार, सौ. जया पाटील, बाळासाहेब सौदागर, इंदुमती जोंधळे, रघुनाथ मिरगुंडे, वसंत केशव पाटील, डॉ. दिनकर पाटील, ज्ञानेश्वर मुळे, दिलीप पाटील, डॉ. वि. रा. तोडकर, श्रीराम पच्छिंद्रे इ. यांनी स्पष्ट मनोगते नोंदविली आहेत.

अशा शेकडो लोकांनी 'रातवा'चं मनापासून कौतुक केलं आहे. असंख्य वाचकांची पत्रे 'दुसऱ्या भागाची आतुरतेनं वाट पहात आहोत.' अशी येतात. फोनवर 'दुसरा भाग प्रसिद्ध झाला का?' म्हणून सतत विचारणा होत होती. वाचकांच्या,

रसिकांच्या प्रेमामुळं मला अधिक प्रेरणा मिळत गेली. उरलेल्या जीवनानुभवाचे चित्रण करायला स्फूर्ती लाभत गेली. म्हणूनच माझ्या हातून लेखन होत राहिलं. 'आणखी एक जन्म' हा उत्तरार्थ जन्माला आला.

'रातवा'ची जनता आवृत्ती काढावी अशी वाचकांनी विनंती केली आहे. काही शाळांच्यामधून प्रार्थनेच्यावेळी रोज पाच-सहा पानं वाचली जातात. काही कुटुंबातून सामुदायिक वाचनही झाले आहे. गडहिंग्लज तालुक्यातील एक शेतकरी तर भांगलण चालू असता मजुरांना, कष्टकऱ्यांना 'रातवा' वाचून दाखवतो आहे. डॉ. डी. वाय. पाटील, दै. महासत्ताचे संपादक वसंतराव दत्तवाडे यांनी तर पुस्तकं विकत घेऊन अनेकांना भेट दिली आहेत. अनेकांनी आपल्या सुहृदांनी 'रातवा' वाचावं म्हणून स्वत: विकत घेऊन दिली आहेत. अनेक विद्यापीठात 'एम्. फिल' या पदविकेसाठी संशोधन चालू आहे. अनेकांनी भारून जाऊन फोनवरून अश्रूधारांच्या साक्षीनं आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अनेकांना हे आपलंच, आपल्या पिढीचं जगणं मांडलं आहे असे भाव व्यक्त केले आहेत.

पहिल्या 'रातवा' या भागाला महाराष्ट्र राज्याचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा 'धनंजय कीर पुरस्कार' प्राप्त झाला आहे. दुसरा अत्यंत प्रतिष्ठेचा मुंबईच्या प्रियदर्शनी अकादमीचा पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार लाभला. नांदेड येथील प्रसाद बन वैद्यकीय प्रतिष्ठानचा, सांगली येथील बिझनेस एक्स्प्रेस फौंडेशनचा 'श्री' पुरस्कार, अकोल्याचा अंकूर साहित्य संघाचा, इस्लामपूरचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार या महत्त्वाच्या पुरस्काराबरोबरच अन्यही पुरस्कार लाभले आहेत.

'आणखी एक जन्म' हा भागही सर्वांना आवडेल असाच लिहून झालेला आहे की नाही ते आपण दिलदार वाचकांनीच ठरवावे. आपल्या पसंतीस 'आणखी एक जन्म' उतरेल अशी आशा आहे. 'रातवा' प्रमाणेच 'आणखी एक जन्म' हा भाग अत्यंत जिव्हाळ्याने प्रकाशित केल्याबद्दल मी मा. उल्हास मेहतासाो, श्री. शीतल मेहता यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांच्यामुळे मी अधिकच प्रकाशात आलो. प्रा. फ. मुं. शिंदे यांचे ऋण तर कायमचेच.

**चंद्रकुमार नलगे**

# १

नोकरीच्या गावात रमून गेलो. आसपासच्या डोंगरी भागातले लोक मनापासून प्रेम करीत होते. आपल्या परड्या-तोरड्यातला भाजीपाला आणून देत. स्वत:ला नाही जमलं तर येणाऱ्या-जाणाऱ्यांकडून किंवा मुलांबाळांकडून पोच करीत. फळ्यामागच्या कोपऱ्यात कणसं, शेंगा यांचं ठाणं बनलं होतं. बरंचसं सुकून जायचं. कुणाला द्यायला जावं तर मास्तरांचं कसं घ्यायचं म्हणून परत करीत. भरीत भर म्हणून आपल्या घरचंच आणखी काही पाठवत. गरीब भाग. त्यांचं मन तिथल्या झाडा-झुडागत, डोंगरा-आभाळागत मोठं, दिलदार आणि प्रेमळ. आतबाहेर काहीच नव्हतं. जीव लावणारी माणसं. मी एवढासा पोर पण एखादी माघारीण निघाली तर देवाआधी माझ्या पाया पडे. तेव्हाच तिचा पाय बाहेर पडे. मोठी माणसं कुठं गावागवंड्याला जायची झाली तर येऊन खिनभर बोलून बसून विसावल्या मनानं निघत. धनगरवाड्यावरची धनगरं करवंदं, जांभळं, तोरणं, डोंबलं, अळू मूठभर का होईना आधी माझ्यापुढं ठेवत. आनंदी मनानं गावोगावी विकायला जात.

तिथल्या आभाळ मातीचा ओलावा, तिथल्या वाऱ्यावादळांचाही लळा अप्रूप

वाटावा असा होता. सुट्टी असली तरी मुलं शाळेच्या अवतीभवतीच खेळ मांडून असत. शाळा त्यांच्या मनाची झाली होती.

अशा या नितळ वातावरणातल्या डोंगर कपारीच्या तांबड्या मातीत मीही रंगून गेलो होतो. तिथल्या मातीतलंच मीही लेकरू बनून गेलो होतो. एक दिवस राऊनं तालुक्याहून एक पत्र आणून दिलं. राऊ म्हणाला,

'तालुकामास्तर सणगर गुरुजीनं दिलंय.' मी थोडा घाबरलो. शाळांचे जून-जुलै, ऑगस्ट महिने म्हणजे महत्त्वाचे, बदलांचे आणि तितकेच तातडीचे असतात. कुंभार मास्तर तर पोटतालुका मास्तर बनलेत. खरं तर त्यांच्या नावे पत्रव्यवहार होणं गरजेचं. पण मलाच पत्र म्हणून थोड्या भीतीने तो सरकारी खाकी लखोटा फोडला. पत्र वाचलं आणि माझ्या मनात संमिश्र भावना दाटून आल्या.

त्या पत्रात 'मला माझं सर्व्हिस बुक भरायला तालुक्याला बोलावलं होतं? नेहमी कामात दंग असलेल्या मला सर्व्हिस बुक भरण्याचा कार्यकारण संबंध माहिती नव्हता. मी कुंभार गुरुजींना पत्र दाखवलं, तेव्हा ते म्हणाले,

'मास्तर तुम्ही कायम झाला.'

मला त्यांचा अजूनही पुरा अर्थ उमगला नव्हता. मी म्हणालो,

'म्हणजे?'

'तुम्ही आतापर्यंत हंगामी होता. शिक्षकाला खात्यानं कायम केलं असा सर्व्हिस बुक भरण्याचा अर्थ असतो. तुम्ही कायम झाला. चांगली घटना आहे. घाबरू नका. सर्व्हिस बुक भरून टाका.'

'म्हणजे मी शिक्षक म्हणून कायम झालो? कायमचा कायम?'

'होय. हंगामी असलं की खातं केव्हाही काढून टाकू शकतं. आता नाही.'

मला खूप आनंद झाला. मी कायम झालो या आनंदात वाण्याच्या दुकानातली साखर आणली. देवा भैरोबापुढं ठेवली. घराला आता माझ्या नोकरीची काळजी करण्याचं कारण नाहीसं झालं.

मी तसा या नोकरीत दंग झालो होतो, तरी मनात एक घोर होताच. तो उसंतीचेवेळी डोकं वर काढी. मी अस्वस्थ बने. एखाद्या रात्रीच्या निवांत वेळी तो मनाला डंख मारून हैराण करी. आपल्याला खातं काढून तर टाकणार नाही ना, असं माझ्या भाबड्या मनाला वाटत राही. मी मास्तर झालो तरी पुरत्या परिपक्वतेचं वय



नव्हतं. ज्यावेळी मी पाचवीची परवानगी काढण्याच्या कामी पहिल्याच वर्षी खात्याच्या ऑफिसकडं गेलो होतो, तेव्हा दिप्योट्यानं शाळेला अचानक भेट दिली होती. रजा असतानाही शाळा बंद म्हणून त्यांनी खात्याकडं रिपोर्ट पाठवला होता. खात्यानं एक रुपया दंड केला होता. त्यावेळी कुणी कुणी कळती मास्तर मंडळी म्हणत,

'तुझी नोकरी टिकेल न टिकेल-'

ही भूणभूण मला पोखरीत होती. ही नोकरी टिकली नाही तर? दादा संतापतील. मारझोड करून घरातून हाकलतील. तसं झालं तर? मग कुठं तरी सालगडी म्हणून जगणं ठरलेलं. रोजगारी ठरलेली. माझ्या नोकरीनं दादांना घराला केवढा मोठा आधार वाटत होता. तो संपला तर? सारंच नशिबीचं पुसलं जाणार होतं.

नोकरी लागली तेव्हा दादा म्हणाले होते, 'नोकरी जिवापरीस सांभाळ. त्यावर प्वॉट आसतं आपलं. आता घराला तुझाच आधार. दळिंदर फिटू दे आमचं.'

आईही असंच काळजीनं बोलली होती,

'नमा, आरं या घराच्या शंभर डुयात शिक्षण नव्हतं. नोकरी कुठली घेऊन बसलाईस. चांगलं झालं लेकरा. आता पावतूर शिक्षणासाठनं खस्ता खाल्ल्यास, तशाच खस्ता नोकरीसाठनं खा. कुणी आँऽ म्हणूनी. जळत-तापत निघाल्याल्या भगवान सूर्या नारायणाला साक्षी ठेव. अमक्यातमक्याचा ल्योक चांगला हाय असा सबूद कानावर पडावा आमच्या... तुझ्या बानं कुणाचं ब्र म्हणून घेतल्यालं न्हाई...' असं आठवत राही. त्या एक रुपया दंडानं नोकरी घालविली तर...?

तो पहिला एक रुपया दंड अजून माझ्या चित्तात होता. संस्थानी राजवाटीचा फतवा आठवला. भरायला एक रुपया नव्हता म्हणून दादांनी नाईलाजानं मला शाळेत धाडलं होतं. त्या एक रुपयवाल्या दंडानं आमच्या घरात अक्षरांची धुळभेट झाली. मी शिकलो. मला थोडं तरी जग कळलं. त्यामुळंच ही असली सोन्यासारखी नोकरी घराला बघायला मिळाली. नाहीतर आबा, तात्या हमाली करत्यात. कामानं त्यांची काळजं फुटून जातायत. रातध्या घामाचा, रक्ताचा घास गिळत्यात. म्हणतील, 'येवढी नोकरी टिकिवता आली नाही. या ओझ्याखाली आम्ही किती मरायचं?' या नोकरीतल्या एक रुपया दंडानं तोंडचा घास पळविला तर...? असे प्रश्न सतावत असायचे. पण सर्व्हिस बुक भरण्याबद्दलच्या सरकारी हुकमानं सारं मनातलं मळभ दूर झालं. गारठलेल्या, ढगाळलेल्या वातावरणात अचानक सूर्य उगवावा तसं झालं.

काळजाला ऊब मिळाली. मनआभाळ मोकळं मोकळं झालं. मी कायम झालो असं आईला सांगायला मन उतावळं बनलं.

मी कायम झाल्याचं ऐकल्यानं आईनं माझ्यावरून मीठमिरच्या ओवाळून चव्हाट्यावर टाकल्या. दादा कधी नव्हे ते आज खूश दिसले. दादांचा कामानं घटाललेला, निबर झालेला, खरबरीत हात माझ्या पाठीवरनं फिरला.

सर्व्हिस बुक कुठं धुंडाळायचं, कुठून मिळवायचं माहिती नव्हतं. कसलं असतं कळत नव्हतं. पण केशव सावळा पाटील यांनी मला बयाजवार सांगितलं. केशव सावळा पाटील हे माझे आवडते गुरुजी. इतर मास्तर त्यांना केशव सावळा म्हणत. बाकी माणसं केशव मास्तर असं संबोधित. त्यांनी सांगितल्यानुसार मी कोल्हापूरला पायपिटी केली. तिथल्या सरकारी छापखान्यातनं सर्व्हिस बुक पैदा केलं. शाहुवाडी तालुका शाळेत जाऊन सणगर गुरुजींच्या देखत भरलं. सणगर गुरुजींनी माझ्या भोवईजवळचे तीळ ओळखण्याची खूण म्हणून लिहिली आणि शाईचे पॅड पुढं करून म्हणाले,

‘आंगठ्याला, बोटांना शाई लावा.’

मला त्यांच्या बोलण्याचं आश्चर्य वाटलं. आंगठा आडाणी माणसं उठवतात. म्हणून मी म्हटलं,

‘मी शिकलोय गुरुजी.’

‘म्हणूनच तर मास्तर झाला तुम्ही.’

‘मग आंगठा?’

‘ओळखीसाठी आंगठाच काय, साऱ्या बोटांचे ठसे उठवायचे असतात !’

मी बोटांचे ठसे उठवले. मनात विचार आला, ‘कितीही शिकलं तरी आंगठा काही सुटत नाही तर !’

मला शाळेत घालताना तिथल्या कागदावर दादांनी आंगठा उठविला होता. आता नोकरीत कायम झालो म्हणून मी आंगठाच काय साऱ्या बोटांचे ठसे उठविले.

त्या शाईनं रंगलेल्या बोटांनी निशाणी जपत मी शाळेच्या गावच्या वाटेला लागलो. दिवस मावळायच्या आत कडवी नदी ओलांडून वरचं मैलोन् मैल पडलेलं पठार आणि निर्मनुष्य जंगल पार करून जायचं होतं. तसाच वाटेला लागलो. मलकापूर



मागं टाकून उचलत्या पावलांनी कडवी नदीवर आलो तर नाव पैलतीरावर होती. मला एक एक क्षण मोलाचा होता. जीवाला उभं वारं सुटलं. माझ्या आधीही बरीच माणसं नावेसाठी तिष्ठत बसली होती. नदीला आलेल्या महापुरामुळं नाव दिवसातून तीन चारच फेरं करी. गावागवंड्याला जाणाऱ्यांची पंचायत होई. नावेची भरती झाल्याशिवाय आंबंकरी नाव सोडणार नव्हता. अंधुकशा पाऊसकाळानं दिवस नेमका कुठं आलाय कळत नसला तरी उशीर व्हायला लागलाय हे उमगत होतं. इकडच्या काठावर नावेच्या बेजमीची माणसं गोळा झाली होती. सगळ्यांनी हाका मारायला लागल्यावर नावाड्यानं नाव सोडली.

नाव आम्हाला घेऊन पैलकाठला पोचली तशी मी घाईनं नावेतनं काठावर उडी टाकली नि बिगीबिगी डोंगरवाटेला लागलो. तेवढ्यात मागून हाक आली,

‘मास्तरांनू.’

मी मागं वळून बघितलं न बघितलं केलं नि पुढं बघून वाट धरली. तशी पुन्हा हाक, ‘आवं मास्तरांनू.’

मी मागं वळून बघितलं तर माणसांच्या दाटीतनं घाईनं वाट काढीत आलेली काखंत गठुळं, हातात पोरगी घेतलेली एक बाई दिसली. गुडघ्यापर्यंत टाचून, जोड दिलेलं लुगडं नेसलेली ती बाई पाय उचलून येत होती. माझ्या पाहण्यात नसलेली, गोरी, नाकेली, गोंदण काढलेली, सडपातळ बाई. पुढं येत ती बाई म्हणाली,

‘मास्तरानू बरी झाली संगत तुमची. म्याबी तिकडंच येतुया...’

‘मला विरळ्याला जायाचंय.’

‘मलाबी तकडंच.’

‘म्हणजे कुठं?’

‘धनगरवाड्यावर. वळीखला न्हाईसा मला?’

‘नाही?’

‘आवं म्या भातकाढणीला इरळ्यालाच यायची की. सारी वाड्यावरची धनगरं असायची. एकदा तुमच्याकडनं पाणीबी प्यालुती की... तीन वर्षं झाली बगा. तुमी नवं नवं आलातासा?’ मला गाव गाठायचा होता, त्या विचारात गढल्यानं माझ्या. लक्षात येत नव्हतं. पण बरं झालं. या डोंगररानातनं निदान तिची सोबत तरी झाली.